# सेवक वार्ता

जून - २०२४

वर्ष -५ अंक- ८

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचे संवाद पत्र


## सेवकच्या शिरपेचामध्ये आणखी एक तुरा

**श्री लोळगे, मध्य रेल्वे, मुंबई यांनी सेवक संघास कळवले की MoEFCC, GOI ने कल्याण-कसारा तिसऱ्या रेल्वे मार्गासाठी सेवक संघाने तयात केलेली वन्यजीव शमन आणि संवर्धन योजना मंजूर केली आहे. ही मंजुरी सेवकच्या शिरपेचामध्ये आणखी एक तुरा आहे. आता, सेवकला सोलापूर- उस्मानाबादचा प्रकल्चासाठी वन्यजीव शमन आणि संवर्धन योजना तयार करण्यासाठी संधी मिळण्याच्या आशा व्दिगुणित झाल्या आहेत. श्री पत्की साहेबांची बुद्धी आणि नेतृत्व आणि चमूचा अनुभव आणि कौशल्य यामुळे हे यश मिळालेआहे. हे यश सेवकचे प्रतिष्ठेला शोभते असे उद्गार श्री. विश्वास सावरकर चमू प्रमुख व अध्यक्ष सेवक संघ यांनी काढले.**

## नागपूर शाखेचा बँक अकौंट अखेर उघडला.

**नागपूर शाखा कार्यान्वयीत होण्यास शाखेचा बँक अकौंट नसणे ही मोठी बाधा ३ वर्षापासून होती. त्याची वाट मध्यवर्ती समिती बघत होती व वारंवार त्याबाबत पाठपुरावा करण्यात येत होता. नवनियुक्त शाखा अध्यक्ष श्री. अशोक खुणे यांच्या अथक परिश्रमाने नागपूर शाखेचा बँक अकौंट गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेत बचत अकौंट अखेर उघडला आहे. त्याबद्दल श्री. अशोक खुणे यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.**

## *नवी आव्हाने*

### सामाजिक वनीकरण विभागातील रोपवाटिकांचे आणि मग्रारोहयो वनीकरण कामांचे मुल्यांकन

पुणे,१९-०३-२०२४

सामाजिक वनीकरण विभागाकडून सेवक संघास, विश्वासाने, रोपवाटिकांचे आणि मग्रारोहयो वनीकरण कामांचे मुल्यांकन करणेबाबत विचारणा केली आहे.

गत वर्षी रोपवाटीका कामांचे मुल्यांकन सामाजिक वनीकरण विभाग संचालनालयाने चंद्रपूर वन प्रबोधिनी कडून करून घेतले होते.यंदा त्यांनी हे काम करण्यास असमर्थता व्यक्त केली आहे. गतवर्षी वन प्रबोधिनीने हे काम सेवककडून करवून घेतले होते.आताही गतवर्षीच्याच मोबदला दराने यंदा काम करणे बाबत सेवकच्या मध्यवर्ती कार्यकारिणीची अनुमती विचाराधीन आहे.अशी अनुमती मिळविण्यासाठी, मुल्यांकन करावयाच्या रोपवाटिकांची जिल्हावार विगतवारी,रोपांची संख्या, मुल्यांकन कालावधी, यांचा तपशील देण्याबाबत संचालनालयास विनंती केली होती, की जेणे करून प्रस्ताव सादर करणेसोईचे होईल. तसेच कळविले की, लोकसभा निवडणुकीच्या कामात कर्मचारी व्यस्त असल्यास,जून मध्ये काम करणे योग्य राहील. यावेळी उन्हाची झळ कमी झालेली असते आणि वयाने ज्येष्ठ सेवक सदस्यांना काम करणे आरोग्य हिताचे व रोपवाटिकांचे मुल्यांकन करणे इष्ट ठरेल.

तथापि सामाजिक वनीकरण विभागाकडून सेवक संघास ५२ रोपवाटिकांचे मुल्यांकन करण्याचे कार्यारंभ दि. -२-२०२४ चे पत्रान्वये प्राप्त झाले आहेत. तथापि, समझोता अभिलेख लोकसभा निवडणुकीच्या आचार संहिता लागू झाल्याने कामास सुरुवात करणे शक्य झाले नाही.

त्या दृष्टीने श्री विठ्ठल पत्की, समन्वयक, सेवक यांनी जोमाने कामास सुरुवात केली आहे.

### अभ्यासक्रम सुधारीत करून वाचन साहित्य निर्माण करणेचे काम... प्रगतीचा आढावा

दि. ३०/०४/२४ रोजी दुपारी ३:३० वाजता मा. APCCF (RET) यांचे अध्यक्षतेखाली वनरक्षकाचे पायाभूत प्रशिक्षणाकरीता वाचन साहित्याचे पुनर्विलोकन करणेबाबत रद्द झालेली सभा दि. ३०/०४/२४ रोजी झाली. सभेकरिता vc द्वारे सर्वांनी उपस्थित होते. चंद्रमाचे संचालक यांनी सर्व सेवक साहित्य लेखक (गट क्रं.१,२,३ विषय), नियुक्त गट प्रमुख यांचे आयोजित बैठकीत प्रामुख्याने अभ्यासक्रम,निर्माण केलेले सुधारीत साहित्य यांचा आढावा, गट प्रमुखांचे सूचनांची पूर्ती इत्यादी विषयांवर चर्चा झाली. साहित्यात ,अभ्यासक्रमातील सर्व बाबी समाविष्ट आहेत किंवा नाही/ तपासणी करणा-या समितीने काही सूचना केल्या असतील,तर त्यांची पूर्तता/ साहित्य अंतिम करण्याची कारवाई यावर चर्चा झाली.

सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र ने प्रस्तावित केलेल्या विहित अभ्यासक्रमासोबत वाचन साहित्याची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी, महाराष्ट्र राज्याच्या वन विभागाच्या शिक्षण विभागातील खालील सदस्यांचा समावेश असलेली समिती स्थापन करणेत आली आहे. या समितीचे कार्य सेवानिवृत्त वनकर्मचारी संघटनेने (सेवक) तयार केलेल्या वाचन साहित्याचे पुर्नरावलोकन करणे, त्यातील मजकूर अंतिम करणे, आणि कोणत्याही आवश्यक बदलांसाठी आवश्यक शिफारसी प्रदान करणे इ.

विषय गट क्रमांक-1 सर्वसाधारण वनसंवर्धन शास्त्र, वृक्ष संवर्धन आणि त्याच्या समुपयोजन पद्धती. पुनरुत्पादन पद्धती, गवताळ क्षेत्र विकास/व्यवस्थापन, जैव विविधता व्यवस्थापन,

अधिकाऱ्याचे नांव व पदनाम

१) श्रीमती पियुषा जगताप, अपर संचालक (प्रशिक्षण)
२) श्री. अविनाश कुमार, अपर संचालक (प्रशासन)
३) श्रीमती मनिषा भिंगे,अपर संचालक (मुख्यालय)

संचालक, चंद्रपूर वन प्रशासन, विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी चंद्रपूर

विषय गट क्रमांक-२ : वन व्यवस्थापन, वनस्पती शास्त्र, वन उपयोगिता, वनमिती, वनसंरक्षण

अधिकाऱ्याचे नांव व पदनाम

१) डॉ. शैलेन्द्र जाधव, संचालक, कुंडल प्रबोधिनी (वने), कुंडल

२) श्री. अमोल थोरात, वि. व.अ.(संशोधन), अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे

३) श्रीमती तृप्ता निखाते, संचालक, वनप्रशिक्षण संस्था, जालना

गट क्रमांक-३ : मृद शास्त्र, मृद व जलसंवर्धन, वनसर्व्हेक्षण आणि GIS वनअभियांत्रिकी, कार्यालयीन कामकाज व लेखा

अधिकाऱ्याचे नांव व पदनाम

1) श्री. हेमन्त शेवाळे, संचालक, दा.चौ. वन प्रशिक्षण संस्था, पाल

2) श्रीमती मुक्ता टेकाडे, संचालक, वन प्रशिक्षण संस्था,चिखलदरा

3) श्री. प्रशांत कोराळे,अपर संचालक मु. व.सं. (शि.व प्र), पुणे

याकामाचे पारिश्रमिकापोटी ७५ टक्के शुल्क सेवक संघास प्राप्त झाले आहे.

## वेधक वृत्त


### प्रासंगिक...

### श्री. वसंत जोशी सरांचे नवीन पुस्तक

### Essence of Bhagad Gita भगवद गीतेचे सार

पुस्तकाविषयी त्यांच्याच शब्दात....

माझ्या Dnyaneshwari Today ह्या पुस्तकात गीतेतील श्लोकांचा व ज्ञाशवरीतील ओव्यांचा शब्दशः इंग्लिश अनुवाद करण्यात आला आहे. परंतु विदर्भातील एक महान अंध संत श्री गुलाबराव महाराज यांनी गीता व ज्ञानेश्वरी यातील श्लोक व ओव्यांमधे दडलेला गूढ अर्थ त्यांच्या अनेक व्याख्यानातून सप्रमाण उलगडून दाखविला होता. परंतु त्यांच्या हयातीत त्याचे पुस्तकात रूपांतर झाले नव्हते ते काम त्याचे संकलन करणारे त्यांचे उत्तराधीकारी श्री बाबाजी महाराज पंडित यांनी ते पुस्तक रुपात तयार करून त्यास गुढअर्थ दीपिका असे नाव दिले. मी त्याचा इंग्लिश अनुवाद करून त्यास भगवद गीतेचे सार म्हणजे Essence of Gita असे नाव देऊन ते श्री मधुसूदन पंडित यांनी प्रकाशित केले. त्याचे देणगी मूल्य रु ४००/- मात्र इतके ठेवण्यात आले आहे.







इच्छुकांनी पुस्तकाची खरेदी करुन पुण्यलाभी व्हावे!

### छप्पन (५६) ची अजब माहिती

* प्रकाश एदलाबादकर

छप्पन (५६) या संख्येला मराठी भाषेत वेगळेच महत्त्व आहे. समजा माझे आणि एखाद्याचे भांडण झाले तर,तो किंवा मी असे म्हणतो की, 'अबे जा बे ...तुझ्यासारखे छप्पन पाह्यले . 'माझ्याही मनात हा प्रश्न आला होता की,' छप्पनच का? पंचावन्न किंवा सत्तावन्न का नाही ?'

शंका निरसनासाठी मी,मराठी भाषेच्या एका प्रसिद्ध ,ज्येष्ठ साहित्यिकाला भेटलो. ते मला म्हणाले की , "संत नामदेवांनी ज्ञानेश्वरी संबंधाने लिहिलेल्या ओव्या तू वाचल्या आहेस का ?"

"हो. एकतरी ओवी अनुभवावी तेच ना ?" मी उत्तरलो .

"बरोबर. त्यात एक ओळ आहे. 'केलासे छप्पन भाषांचा गौरव' अर्थ असा की ज्ञानेश्वरीत मराठी भाषेतील छप्पन भाषांमधील शब्द आलेले आहेत. त्यांच्या काळात मराठीच्या छपन्न बोली होत्या. वऱ्हाडी, झाडी, मालवणी, कोंकणी, अहिराणी, माणदेशी, अशा अनेक परंतु छप्पन बोली होत्या. आता एक लक्षात घे. छपन्न प्रकारच्या बोली बोलणारे छपन्न प्रकारचे समाज. प्रत्येकाची रीतभात वेगळी,वृत्ती वेगळी, व्यवहार वेगळा ! अशी छपन्न प्रकारच्या मनोवृत्तीची माणसे होती. म्हणून 'तुझ्यासारखे छपन्न पहिले असे म्हणण्याची पद्धत आली"

ते पुढे म्हणाले, "छपन्न प्रकारचे समाज म्हणजे स्वयंपाक करण्याच्या छपन्न रीती. म्हणून 'छपन्न भोग'. छपन्न प्रकारचे नैवेद्य. समाजात एखादी बाई खूप भांडकुदळ, वचवचा बोलणारी, उठवळ स्वभावाची असेल तर, तिला 'छप्पन टिकल्यांची आवा' म्हणतात. म्हणजे सर्व छपन्न प्रकारच्या समाजात जाऊन आपल्या नावाचा दगड पाडून आलेली"

पुरुषोत्तम पाठक यांनी वर विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात मला जे आठवले ते पाठवले.

नाना पाटेकरच्या चित्रपटाच्या "अब तक छपन्न'' या शीर्षकामागीलही कारण हेच असेल काय?

## येक तरी झाड लावा

कवयत्रि – श्रीमती. अंजनाबाई श्रीराम ख़ुणे
जि. गोंदिया ४४१७०२

मोटा झाड होऊन तो
सावली देवाचा होता
मानसाच्या मुजोरीलं
त्याना टेकलन माथा ।१।
बागावाचा फराना तो
होता फुलावाचा ख़ास
मानसाच्या कुराडीना
त्याची पाल्लन गा रास ।२।
फुला देवालं देयेल
खावालं देयेल फरा
फिरस्त्यालं गा सावली
बंडीलं देयेल धुरा ।३।
देते जारावाल सूड
तपनीलं गा सावली
लाव येक तरी झाड
तेच तुजी गा माऊली ।४।
बकान ना कडुनिब
आंब, चिचा, बोरी लावा ।५।
हिड्डडा, बेहेडा ना बेल
लावा झाड धुऱ्यावर
दवाईच्या कामासाटी
उपयोगी खरोखर ।६।
पानी, ईज, ठंडी, वारा
नाई याची पर्वा त्यालं
मानसाच्या भल्यासाठी
हमेस्या तो हालं डुलं ।७।
मानसाच्या जलमालं
येक गन तुमी येवा
घरी- वावरी आपल्या
येक तरी झाड लावा ।८।

**शब्दाचे अर्थ -**
मोटा- मोठा , देवाचा – देण्यासाठी
बागावाचा – वाकणे, फराना – फळामुळे
फुलावाचा – फुलोरा येणे, पाल्लान – तोडले
कुराडीना – कुर्हाडिने, खावालं - ख़ाण्यासाठी
फरा - फळे, फिरस्त्यालं – फिरणारे यांना
बंडीलं – बैलबंडी, धुरा – लाकुड
जारावाल – जाळण्यासाठी, सूड – जळाऊ लाकुड
तपनीलं - उन्ह , तूजी – तूझी
आवरा- आवळा, हिड्डडा – हिरडा
धुऱ्यावर – बांधावर, ईज- विज
नाई – नाही, हमेस्या – नेहमी
जलमालं – जन्माला, येक गन – एक वेळ
कवयित्री श्री. अशोक खुणे सेनिविवअ यांच्या आई आहेत.

## .|| कीनवट अरण्यसेवा||.

### (आठवणी जंगलातील)

* रमेश माणिकराव विभागीय वनाधिकारी,
आणि सौ.अलोलीका र. सोनटक्के

किनवट तालुका म्हणजे मराठवाड्याला मिळालेली एक सुंदर वनश्री वनराई होय.

किनवट वनक्षेत्र तसं भोकर तालुका संपल्यानंतर हिमायत नगर पासून ते पुढे माहूरगड (रेणुकामाता) पर्यंत पसरलेला वनाचा उंचसखल भुभाग. याच तालुक्यास लागून असलेली वनांची सिमा म्हणजे पैनगंगा नदी,जी की विदर्भ व मराठवाड्याची सरहद्द. कीनवटवनांची वनवृक्ष (पानझडीची जंगलंक्षेत्र) घनता अतिशय जास्त दाट प्रमाणात आहे. वनात सहज दिसणारे वन्यजीव मांसाहारी अस्वल तडस बिबट तसेच तृणभक्षी प्राणी हरण निलगाय आहेत.

मोर पक्षांचा राजा(हा पक्षी) सहजच बघायला मिळे. नेहमीच मोरांचा आवाज या क्षेत्रात मनाला भुरळ घालते. मोर जंगलात ढग आल्यावर त्याचा पिसारा व नृत्य म्हणजे डोळ्याची पारणे फीटणारे दृश्य, अगदीच संस्मरणीय क्षण हृदय मनाच्या पटलात कोरली गेलेली निसर्गातील अप्रतिम नजराणा. आजही हे क्षण मनात आठवले की सहजच मन आठवणीत सुखावते. कीनवट वनक्षेत्रात वनविकास महामंडळाकडे माझी प्रतिनियुक्ती होती.

श्रीमान गुंडेराव शंकरराव साबळे (माझे रेंजर्स महाविद्यालय, चंद्रपूर येथील सवंगडी) म्हणजे परममित्र आणि माझ्या मनात मराठी पुस्तक वाचनाची गोडी लावणारे दिलखुलास एक व्यक्तीमत्व. योगायोगाने आमची दोघांची एकाच तालुक्यात काम करण्याची संधी मिळाली. दोघेही काहीकाळ ९/१०महीने) अविवाहित असल्याने एकत्रित वास्तव्यास होतो.

मागील ३०/३५ वर्षात असाही एकही आठवडा नसेल की जेंव्हा आम्ही फोनवर एक दोन वेळा संभाषण केले नाही.

'हृदय आणि मनाची' जुळवाजुळव करणारे एकमेव नाते म्हणजे मैत्री.

आमचे वैचारिक सुद्धा वादविवाद कधीच झाले नाहीत. कारण त्यांच्या वाचनाचा आवाका अतिशय दांडगा, त्यामुळे त्याचं म्हणणे शांततेत ऐकून घेणे. किंबहुना कोणताही विषय घेऊनआमचा कधीच वादविवाद झाला नाही.

बरीच वनखात्याच्या बाहेरील मंडळी मला तुम्ही साबळे साहेब यांचे परममित्र म्हणूनच ओळखतात. असो त्यांचा शांत स्वभाव व स्पष्टपणे बोलणं एकदम मजेशीर असते.

किनवट तालुक्यात सुद्धा आम्ही एकत्र वनात काम केले, त्याकाळी १९८८/९१ दळणवळणाची साधने सुद्धा अतिशय मोजकीच होती. त्याकाळी सकाळी

उठून तयार होऊन 'बस'ने काही अंतरापर्यंत प्रवास आणि नंतर पायपीट करत वनदौरे करायचो. त्याकाळी वनखात्यातील जेष्ठ मंडळी आम्ही दोघेही कामात व्यस्त रहायचो.

त्यामुळे बरीच जेष्ठ मंडळी आम्हाला व कामाठे (workaholic) असा टोमणा मारुन कधीच आम्हांस मनमोकळेपणाने बिनधास्त बोलत नसत. पण किनवट येथील शैक्षणिक संस्था शाळा कॉलेजची सर्व मंडळी प्रा. व प्राचार्य आम्हाला आवडीने बोलत असत. त्यावेळी मी वन विकास महामंडळात होतो. कामाचा व्याप एवढा होता की संध्याकाळी दोघेही जेवणानंतर ५/१०-मीनीटात झोपी जायचो. पायपीट व धावपळीमुळे सकाळी उठण्यास कधी कधी वेळ व्हायचा, पण श्री साबळे मात्र सकाळीच ५.३०/ ६.०० ला उठून तयार व्हायचे.

त्याकाळी या दुर्गम भागात नक्षलवादी चळवळ होती. दैवयोगाने सर्वत्र अतिशय दुर्मिळ दुर्गम भागात पायपीट करूनही नक्षलवादी मंडळी यांची चुकूनही भेट झाली नाही. तसेच कुठे जवळपास नक्षलवादी असल्याबद्दल कुणी आम्हाला सांगितलेही नाही. एकंदरीत सर्व वनजंगल फीरती पायी दौरे करतांना कधीच मनात भिती दडपण आले नाही.

पुस्तकं वाचण्याशिवाय रविवारी साप्ताहिक दिवशी दुसरा पर्याय नव्हता. कारण त्या काळी १/२ -मराठी वर्तमान पत्र येत असत.

काही २०/२५ मिनीटात सर्व वर्तमान वाचून आम्ही संपवून टाकत. रविवारी साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी बरीच मंडळी दुरदर्शनसंचास उंच अँटेना लावून झीळझीळ टिव्ही वरील रामायण महाभारत बघत असत. बघण्या/चित्रापेक्षा सर्व डायलॉग ऐकतच म्हणावे लागेल. सर्वत्रच दुरदर्शन संचात एकच मालीका चालू असल्याने, आपोआप ती सिरीयल रामायण / महाभारत मालीका 'आवाज' आपोआपच आमच्या कानी पडायचा व दूरचित्रवाणी संच नसतांनाही सिरीयल मधील सर्व बाबींचा अप्रत्यक्ष आनंद (बघण्याचा) आनंद आम्ही लुटला आहे.

अशा दुर्गम अतिशय वनराईत काम करण्याची संधी मला मिळाली. मनात कधीही वन्यजीव किंवा इतर कसलीही भीती वाटली नाही. आजही त्या आठवणींने मन आनंदीत होते.

(उर्वरित आठवणी पुढील लेखात)

## आजीवन सदस्य

श्री .एन पी कापसे से.नि.व प.अ. रा.सिंदेवाही यांनी सेवक संघाचे चंद्रपूर शाखेत दि.५-६-रोजी आजीवन सदस्यत्व घेतले आहे. त्यांचे परिवारात सहर्ष स्वागत आहे.

आजीवन सदस्य म्हणून पुढील सदस्यांनी नावे नागपूर शाखेत सदस्यत्व घेतले आहे.

1) एम एम पडोळे वनपाल (निवृत्त) नागपूर
2) डी डब्ल्यू तिजारे वनपाल (निवृत्त) नागपूर
3) रियाझ अहमद खान वनपाल (निवृत्त) नागपूर

## निधन वार्ता

१. बी.एम भुतडा सेवानिवृत्त विवअ यांचे ३० मे रोजी वयाच्या ६८व्या वर्षी नागपूर येथे दुःखद निधन झाले. सर्वांशी प्रेमाने वागणारे व आपल्या मधुर वाणीने जिंकून घेणारे तसेच आपल्या कर्तव्य प्रती सदैव तत्पर असणारा अधिकारी म्हणून ते परिचित होते. त्यांच्या जाण्याने एक सच्चा निसर्गप्रेमी व मित्र हरवला आहे. वैराट, पस्तलाई व चूर्नी येथील गावकऱ्यांना त्यांचे पुनर्वसन कार्य सदैव स्मरणात राहील. मेळघाट मधील बोरीखेडा गावाला आदर्श गाव करण्यासाठी त्यांनी कसून प्रयत्न केले होते. सेवक संघ परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांचे आत्म्यास सदगती देवो, ही प्रार्थना.

*********************



२. प्रख्यात वन्यजीव संरक्षक डॉ. ए.जे. टी. जॉन सिंग यांचे बंगळुरू येथे दीर्घ आजाराने निधन झाले.

भारताचा सर्वात शूर हरित योद्धा आणि पृथ्वीच्या वनस्पती आणि प्राण्यांचे कट्टर रक्षक यांचे निधन झाले. तुलनेच्या पलीकडे उदार आणि समानतेच्या पलीकडे शिक्षक होते, त्यांनी संवर्धनाच्या जगात एक कठीण वारसा सोडला आहे.

सेवक संघ परिवारातर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांचे आत्म्यास सदगती देवो, ही प्रार्थना.

ता. क. १.अमरावती वृत्तातील कँपा कामाचे मुल्यांकनाबाबत सेवककडे विचारणा.

२. सोलापूर-उस्मानाबाद रेल्वे लाईन कामाअंतर्गत वन्यजीव शमन आराखडा तयार करण्याचे कामास नव्याने चालना मिळण्यास सुरूवात.

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी
कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६